महत्वाचे पत्र

जा.क्र./विप्र-७/क्रॉपसॅप १६-१७/प्र.क्र.१/५६९/१६
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११ ००५
दिनांक: १४/१०/२०१६

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व) ----------------------------------------

२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व) ------------------------------------

**विषय:** पिकांवरील कीड-रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (कॉपसॅप): २०१६-१७ मार्गदर्शक सुचनांतील अंशत: बदलाबाबत...

**संदर्भ:** १. आयुक्तालयाच्या अंतरीम मार्गदर्शक सुचनांचे पत्र जा.क्र./विप्र-७/क्रॉपसॅप १६-१७/प्र.क्र.१/३०९/१६, दि.१/६/२०१६

२. आयुक्तालयाच्या अंतिम मार्गदर्शक सुचनांचे पत्र जाक्र/विप्र-७/क्रॉपसॅप १६-१७/प्र.क्र.१/३८२/१६, दि.२७/०७/२०१६

३. क्रॉपसॅप प्रकल्पांतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतनाबाबत संचालक, विस्तार व प्रशिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दि.२७/०९/२०१६ रोजी झालेल्या आढावा सभेच्या इतिवृत्ताचे पत्र जा.क्र./विप्र-७/क्रॉपसॅप १५-१६/कंत्राटी क.वे.बै./५६०/१६, दि.६/१०/२०१६

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने सन २०१६-१७ मध्ये क्रॉपसॅप प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने आयुक्तालयाच्या संदर्भीय पत्र दि.१/६/२०१६ व २७/७/२०१६ नुसार मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. या प्रकल्पांतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन अदायगीबाबत दि.२७/०९/२०१६ रोजी आढावा सभा घेण्यात आली होती. या सभेतील निर्णयानुसार कार्यवाही करणेच्या दृष्टीने संदर्भीय पत्र दि.६/१०/२०१६ नुसार सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदर पत्रातील मुद्दा क्र.५ चे अवलोकन व्हावे. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या पुरवठ्यासाठी निविदा प्रकाशित करणे, मनुष्यबळ सेवा पुरवठादार निश्चित करणे, पुरवठादार संस्थेशी करार करणे या सर्व बाबी विभाग स्तरावर होत असल्याने कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतन अदायगीमधील कालापव्यय टाळण्याच्या दृष्टीने कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन जिल्हास्तर ऐवजी आता विभाग स्तरावरुन अदा करण्याचा निर्णय झाला आहे. या पार्श्वभुमीवर मार्गदर्शक सुचनांमध्ये बदल करणे क्रमप्राप्त ठरते, सदर बाब विचारात घेऊन क्रॉपसॅप प्रकल्पाच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये पुढीलप्रमाणे अंशत: बदल करण्यात येत असून त्यानुसार सुधारीत केलेले मुद्दे खालीलप्रमाणे वाचावेत.

**९.३.३ पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.**

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी हे कीड सर्वेक्षकांना नेमून दिलेले काम व उपस्थितीनुसार संबंधितांचे वेतन अदा करण्याबाबत हजेरीपत्रकासह अहवाल तयार करुन विभागीय कृषि सहसंचालक यांना दर महीन्याच्या तीन तारखेपर्यंत सादर करतील. कृषि उपसंचालक (पीक संरक्षण) हे कृषि आयुक्तालय स्तरावरील लेखापाल व संगणक ऑपरेटर यांचा उपस्थिती अहवाल विभागीय कृषि सहसंचालक, पुणे विभाग, पुणे यांना दर महीन्याच्या तीन तारखेपर्यंत पाठवतील.

**९.३.४:** मुद्द्यामध्ये नमूद केलेल्या जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी ऐवजी विभागीय कृषि सहसंचालक असे वाचावे.

९.३.५ पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचा अहवाल व हजेरीपत्रक याच्या अधारे मनुष्यबळ सेवा पुरवठा ठेकेदाराकडून सादर करण्यात आलेला उपस्थिती अहवाल, पगारपत्रक/हजेरीपत्रक व देयकांची विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील लेखाधिकारी व विभागीय अधिक्षक कृषि अधिकारी तपासणी करतील.

९.३.६ पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

सेवा पुरवठा ठेकेदाराने मागील महिन्यात त्यांचेकडील संबंधीत कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा, सेवा कर व इतर शासकीय नियमाप्रमाणे देय रकमा शासनास चलनाद्वारे भरल्यांची विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील लेखाधिकारी व विभागीय अधिक्षक कृषि अधिकारी खात्री करतील, त्याचबरोबर संबंधीत कर्मचाऱ्यांना ठेकेदाराने सादर केलेल्या पगारपत्रक/हजेरीपत्रकानुसार वेतन मिळत असल्याबाबत खात्री करुन विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील लेखाधिकारी विहीत लेखा कार्यपध्दती तसेच, निर्धारीत अटी व शर्तींच्या अधीन राहून संबंधीत मनुष्यबळ सेवा पुरवठा ठेकेदारास दर महिन्याच्या दहा तारखेपर्यंत देयके अदा करतील. कंत्राटी कर्मचाऱ्यांचे विहित कालमर्यादेत वेतन अदा करणे ही विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील विभागीय अधिक्षक कृषि अधिकारी व लेखाधिकारी यांची संयुक्तीक जबाबदारी राहील.

वरील बदलांचे अनुषंगाने मुद्दा क्र. १४ मधील प्रकल्पांतर्गत क्षेत्रिय स्तरावर "अर्थसंकल्प वितरण प्रणाली" (बीडीएस) व्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीच्या तक्त्यातील अ.क्र.३ मधील कीड सर्वेक्षक व कृषि आयुक्तालय स्तरावरील लेखापाल, संगणक ऑपरेटर यांचे वेतन व त्यासाठीचा सेवा पुरवठादार संस्थेच्या सेवा आकार या बाबींवरील निधी आहरीत व संवितरीत करण्यासाठी लेखाधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय यांना संचालक, विस्तार व प्रशिक्षण हे प्राधिकृत करीत आहेत.

सदर बदलांनुसार तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. यामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई अथवा अनियमितता होणार नाही तसेच वेतनाबाबत कर्मचाऱ्यांच्या तक्रारी होणार नाहीत याची सर्व संबंधीतांनी सर्वतोपरी दक्षता घ्यावी.

कृ.वि.देशमुख
संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य